# मंत्रिमंडळ निर्णय

**१२ मे २०१०**

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत सुधारणा करण्याचा निर्णय

२. काजू प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन.

३. बेदाणा व मनुका वरील मूल्यवर्धित कराचा दर १ टक्क्याने कमी.

४. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १४ नवीन पदे.

५. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर राज्यात प्रभावीपणे वसूल करण्यासंदर्भातील कार्यपध्दती निश्चित करणेबाबत

१२ मे २०१०

# महात्मा  गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत सुधारणा करण्याचा निर्णय

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत पुढील प्रमाणे  सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता प्रशासकीय व तांत्रिक यंत्रणेचे बळकटीकरण करणे गरजेचे असून त्यासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या निधिव्यतिरिक्त राज्य निधीतून खर्चाच्या ३ टक्के अतिरिक्त निधी यंत्रणा बळकटीकरणासाठी देण्यात येईल.

यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी प्रमुख घटक म्हणून ग्राम रोजगार सेवक व तांत्रिक पॅनल यांना कामाचे २.२५ टक्के आणि ३ टक्के देय राहतील.

ग्राम पंचायतीप्रमाणे शासकीय यंत्रणेस सुध्दा ग्राम रोजगार सेवक व तांत्रिक पॅनल नेमण्याची मुभा राहील आणि ग्राम पंचायतीप्रमाणे त्यांना मानधन देय राहील. या प्रयोजनासाठी राज्य निधीतून सुमारे  १२-१३ कोटी इतका निधी द्यावा लागेल.

सद्य स्थितीत कामाला प्रशासकीय  व तांत्रिक मान्यता जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांकडून देण्यात येत आहे. तथापि अधिकारांचे विकेंद्रीकरण करुन हे अधिकार तालुका स्तरावर देण्यात येतील.

सन २००६ पर्यंत विभागीय आयुक्त यांना इतर विभागाचे अधिकारी किंवा कर्मचारी यांना शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार होते ते त्यांना पुन्हा देण्यात येतील.

म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत नवीन कामे घेण्याबाबात केंद्र शासनाला शिफारस करण्यात येईल.

म.ग्रा.रो.ह.यो ची अंमलबजावणी प्रभावी व गतीने होण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची स्थापना करण्यात येईल.

मग्रारोहयोच्या राज्य तसेच विभाग स्तरीय प्रसिध्दी साठी  राज्य निधीतून ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल.

मजूरीचे वाटप वेळेवर होण्याकरिता Business Correspondent Model ची प्रभावीपणे अंमलबजावणी व मजूरी वाटप व बँकांना १ टक्के कमीशन देण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

या संदर्भात मंत्रालय स्तरावर नवीन पद निर्मिती करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

---o---

## काजू प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ खाली राज्यातील काजू प्रक्रिया घटकांनी १२.५ टक्के इतका मुल्यवर्धित कराचा भरणा केल्यानंतर त्यांना त्या कराची रक्कम प्रोत्साहन अनुदान म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली. ही सवलत दोन वर्षांसाठी अनुज्ञेय राहील. अनुदान वाटपाची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबतची कार्यवाही उद्योग विभागामार्फत केली जाईल.

---o---

## बेदाणा व मनुका वरील मूल्यवर्धित कराचा दर शुन्य टक्के

बेदाणे व मनुका या दोन वस्तुंवरील मूल्यवर्धित कराचा दर पाच टक्क्यांवरुन शुन्य टक्के करण्यास मान्यता देण्यात आली. ही सवलत दोन वर्षांसाठी अनुज्ञेय राहील.

---o---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १४ नवीन पदे

महाराष्ट्र बै.जी.वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे सी.टी. स्कॅन व एम.आर.आय विभागासाठी नव्याने १४ पदे निर्माण करण्यास व त्यावरील अंदाजे रु. ४७,००,००० (रुपये सत्तेचाळीस लाख फक्त) एवढ्या वार्षिक आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली.

या पदांमध्ये प्रत्येक एक सहयोगी प्राध्यापक (क्ष-किरण शास्त्र) व अधिव्याख्याता (क्ष- किरण शास्त्र), प्रत्येकी चार एम.आर.आय.तंत्रज्ञ व सी.टी. स्कॅन तंत्रज्ञ आणि प्रत्येकी दोन स्टाफ नर्स व क्ष-किरण सहायक यांचा समावेश आहे.

---o---

१२ मे २०१०

## इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर राज्यात प्रभावीपणे वसूल करण्यासंदर्भातील कार्यपध्दती निश्चित करणेबाबत

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम,१९९६ च्या कलम ३ प्रमाणे शासनाकडून सर्व इमारत व इतर बांधकाम यासाठी करण्यात आलेल्या तरतूदीतून बांधकामासाठीच्या १ टक्का उपकराची रक्कम कामगार विभागांतर्गत इमारत व इतर बांधकाम कल्याण मंडळाच्या खात्यात वर्ग करण्याची तरतूद सन २०१०-२०११च्या अर्थसंकल्पात करण्यास मान्यता देण्यात आली.

पुढील प्रत्येक वर्षात ही तरतूद अर्थसंकल्पात वर्ग करण्यासाठी दाखविण्यात येईल. तसेच मंत्रिमंडळाने संबंधित विभागांना असेही आदेश दिले की, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ च्या तरतूदीप्रमाणे सर्व विभागांनी खाजगी बांधकामावर १ टक्का उपकर बांधकामास टप्प्याटप्प्याने परवानगी देतेवेळेसच मालकाकडून प्रचलित विधेयकाच्या नियमाप्रमाणे गोळा करुन नियमाप्रमाणे इमारत व इतर बांधकाम कल्याण मंडळात भरावेत.

याचा लाभ राज्यातील २० लाख इमारत व इतर बांधकाम कामगारांना होणार आहे व या रकमेचा वापर करुन इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या मंडळामार्फत बांधकाम कामगारांना सुरक्षितता व आरोग्यसंबंधी सोयी सुविधा व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच या कामगारांना इतरही लाभ जसे निवृत्ती वेतन,बोनस,उपदान, कौशल्यवृध्दी करणे, पाल्यांसाठी शिष्यवृत्ती, अपघात विमा, अत्यंविधी खर्च, इ.लाभ देण्यात येणार आहेत.

तथापि हा उपकर गोळा करण्याची तपशिलवार पध्दत व त्याचे मूल्यांकन करण्याची पध्दत व त्या मूल्यांकनाच्या अनुषंगाने पूरक कार्यवाही करण्याची पध्दत विस्तृतपणे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील सर्व संबंधित अधिका-यांच्या समितीत ठरविण्यात येणार आहे.

---०---